**नि.दि.दा.क्र. २६०/२०२१**

**वैजिनाथ वि. नागनाथ व इतर**

**नि.क्र. ३५ च्या पुढे**

**वादीतर्फे सा. क्र.३ ची शपथेवर जबानी**

माझे नांव :– रामचंद्र तुकाराम मदने,

वय :– ७० वर्षे, धंदा – धंदा – शेती.

राहणार :– सताळा, ता. उदगीर, जि. लातुर.

**(नि.क्र. ३६ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर उलटतपासाची परवानगी दिली.)**

**प्रतिवादी क्र. १ ते ५ तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.ए. स. सावंत यांचे मार्फत शपथेवर सुरुः–**

२. मी व वैजनाथ मित्र आहोत. आम्ही दोघे मिळून ५० वर्षापूर्वी बैलाचा व्यापार करत होतो. सदरील व्यापार आम्ही नळेगाव व हाळी येथे करत होतो. माझे व त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत. माझे ७ वी पर्यंत शिक्षण झाले आहे. वादी, प्रतिवादी यांच्यात वाद असलेली जमीन ७६ आर असल्याचे मला माहित आहे व त्याचा गट क्रमांक पहिले ११५ होता आता २८१ झाला आहे. वादी, प्रतिवादीच्या जमिनीचा ७/१२ उतारा पाहण्याचा योग मला आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरील जमीन पुर्वी गोविंद यांच्या नावे होती व ती त्यांची वडिलोपार्जित जमीन होती. हे म्हणणे खरे नाही की, गोविंद यांच्या मृत्यूनंतर सदरील जमीन वैजनाथ, नागनाथ, गोपिनाथ उर्फ बाबुराव यांच्या नावे आली.

३. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्यात अद्याप वाटणी झाली नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, नागनाथचा हिस्सा त्यांनी विकला आहे. त्यांच्यात वाद कधी झाला हे

मला माहित नाही. त्यावेळी मी तेथे हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, नागनाथ व वैजनाथ यांच्यातील वाद मी, नागनाथ तिरुके व पंढरी तिरुके यांनी मिटवल्याचे मी खोटे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी तसेच प्रतिवादी क्र.१ व २ हे त्यांच्या हिश्यास असलेल्या जमिनीचे स्वतः पिकविमा भरतात.

**४.** मयत गोविंदला किती मुली आहेत ते मला माहित नाही. वैजनाथने पोलीस स्टेशनला प्रतिवादीविरुध्द कधी अर्ज दिला हे मला माहित नाही. सोनाली चिंतले हिला मारहाण झाल्याचे मी ऐकीव आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्यात अद्याप वाटण्या झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, वैजनाथला मदत व्हावी म्हणून खोटे शपथपत्र दाखल करुन आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2025.03.20 16:52:18 +0530

दिनांक :– २०/०३/२०२५.

( एन. जे. चव्हाण )

३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर

उदगीर.